# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार

**डॉ. कांचन विजय नलावडे.** सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा मो. नं. ९४२२६९२३९६

ई मेल – nalawadek37@gmail.com

---

**प्रस्तावना-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील विविध घटकांच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक विकासासाठी बहुमोल असे योगदान दिलेले आहे. भारतीय समाजातील हजारो वर्षाची विषमतेच्या तत्त्वावर आधारलेली समाजव्यवस्था नष्ट करून त्याऐवजी समाजातील सर्व घटकांना समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मानवी मूल्यांची जाणीव करून देऊन नवसमाज निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी कार्य केले. डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांनाही सर्व क्षेत्रामध्ये मानसन्मान मिळावा यासाठी महत्वपूर्ण असे योगदान दिले. आपल्या समाजातील पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना सक्षम करण्यासाठी सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य महत्वाचे आहे. स्त्रियांचे शिक्षण, त्यांचे समाजातील व कुटुंबातील स्थान, त्यांच्यावर होणारा अन्याय, भारतीय स्त्रियांच्या जीवनात अमूलाग्र बदल होऊन त्यांच्यात सुधारणा झाली पाहिजे या विषयीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूलगामी चिंतन या निबंध लेखनातून अभ्यासले जाणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे-**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व काळातील स्त्रीजीवन समजून घेणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्त्री शिक्षणविषयक भूमिका समजून घेणे.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीसुधारणेसंबंधीचे चिंतन व विचार समजून घेणे.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्रीविषयक विचारांचे आजच्या काळातील महत्त्व समजून घेणे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून शोधनिबंधाची मांडणी केलेली आहे.

**आंबेडकरपूर्व काळातील स्त्रीजीवन -**

१९व्या शतकात सर्वत्र अज्ञानाचे, अनाचाराचे, विषमतेचे, धर्मरूढींचे साम्राज्य पसरलेले होते. सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती तर खूपच खालावलेली होती. पुरुषप्रधान समाजरचनेत स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्वच साफ नाकारण्यात आले होते. स्त्रीसुद्धा माणूस आहे तिला मन, भावना, विचार करण्याची शक्ती आहे हे नाकारून स्त्रीजन्मच अशुभ मानला जात होता. स्त्रियाही प्रदीर्घ काळ होत आलेल्या अन्यायामुळे आपले सत्त्व व स्वत्वच गमावून बसल्या होत्या. गुलाम म्हणून आश्रितासारखे व परावलंबी जीवन जगणे त्यांच्या अंगवळणी पडून गेले होते. स्त्री गुलामगिरीची ही परंपरा मनूपासून सुरु झाली होती. धर्मग्रंथातून स्त्री व शूद्रांना पशूपेक्षाही हीन समजून तशी त्यांना वागणूक दिली जात होती. स्त्री म्हणजे केवळ पुरुषाच्या वासनापूर्तीचे एक साधन असे मनूने म्हटल्यामुळे स्त्री जातीचे एकूण अस्तित्वच संपुष्टात आले होते. समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान कोणत्या प्रकारचे होते याबद्दल डॉ. मा.गो. माळी लिहितात, " अगदी प्राचीन काळच्या आरंभापासून स्त्री - समाजाचे सर्व प्रकारचे अस्तित्व हिरावून घेऊन गरीब गाय, पायाची दासी, अडीअडचणीच्यावेळी सोन्यानाण्यासारखी उपयोगी पडणारी व देता घेता येण्यासारखी एक वस्तू असा सोयीस्कर विचार आणि आचार अगदी आजपर्यंत होत आला आहे."[१] ही वस्तुस्थिती लक्षात घेता स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन लक्षात येतो. सामाजिक चालीरीती व रूढीपरंपरेत बालविवाह, केशवपन, सतीची चाल अशी अनेक बंधने स्त्रियांवर लादली गेली होती.

स्त्री-शूद्रांना शिक्षणाची द्वारे खुली नसण्याच्या कालखंडातच पेशव्यांची राजवट संपुष्टात आली आणि इंग्रजांची राजवट सुरू झाली. इंग्रजांच्या साम्राज्यामध्ये ज्ञानाचा धूसर प्रकाश दिसू लागला. इंग्रजांनी भारतातील जनतेसाठी काही सुधारणा आणल्या. त्यामध्ये शिक्षणाची सुधारणाही होती. सरकारी शाळांबरोबरच मिशनरी शाळांचेही शिक्षणाचे कार्य सुरु झाले होते. अनेक समाजसुधारक बाळशास्त्री जांभेकर, आगरकर , गोपाळराव हरि देशमुख, भाऊ महाजन यांनी याच शाळातून शिक्षण घेऊन आपल्या समाजातील दोषांवर प्रखर हल्ले चढविले व समाजसुधारणेसाठी प्रयत्न केले. जोतीराव फुले यांनीही याचकाळात स्वत: शिक्षण घेऊन शैक्षणिक व सामाजिक कार्य केले. जाती आणि धर्माच्या नावावर होणाऱ्या अमानुष शोषणातून स्त्रियांची मुक्तता करण्यासाठी गौतम बुद्ध, महात्मा जोतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षि शाहू महाराज. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीशिक्षणविषयक विचार –**

स्त्रियांचा उद्धार करायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले होते. मनूने स्त्रियांचे अधिकार नाकारले. ही जुलमी व्यवस्था नाकारून स्त्रियांना सन्मानाने जगता आले पाहिजे. स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार झाल्याखेरीच, त्यांच्यात स्वत्वाची जाणीव निर्माण होऊन, त्या निर्भय होऊन त्यांचा जगण्यातील आत्मविश्वास वाढेल. आत्मविश्वास वाढल्याशिवाय त्यांची उन्नती होणार नाही. तेव्हा स्त्रियांमध्ये विशेषतः अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या उपेक्षित व असहाय्य स्त्रियांत आत्मविश्वास निर्माण झाल्याखेरीज त्यांची स्वत :ची व समाजाची उन्नती होणार नाही. अशाप्रकारे आत्मविश्वास निर्माण करण्याचे

शिक्षण हे एक माध्यम आहे अशी भूमिकाही त्यांनी मांडली. शिक्षणाचे महत्त्व सांगताना डॉ. आंबेडकर म्हणतात, "उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाअभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो."[२] स्त्रिया सामाजिक, धार्मिक रुढी परंपरेच्या बंधनात जगत होत्या त्यातून त्यांची त्या स्वत: च विचार प्रवृत्त होऊन सुटका व्हायची असेल तर शिक्षण महत्त्वाचे आहे हे डॉ. आंबेडकरांनी ओळखले होते.

स्त्रियांना शिक्षण द्यावे परंतु तेदेखील सहशिक्षण द्यावे. स्त्री पुरुषांना एकच व एकत्र शिक्षण दिले पाहिजे असे आंबेडकरांचे मत होते. स्त्री – पुरुष सहशिक्षणामुळे स्त्रिया समाजात निर्भिडपणे वावरू शकतील व स्त्री पुरुष समानता रुजेल असे त्यांचे मत होते. बहिष्कृत हितकारिणी सभे मार्फत त्यांनी अस्पृश्यांच्या कल्याणासाठी शाळा, वसतिगृहे आणि ग्रंथालये सुरू केली. याच्या आधीही त्यांनी १९२० साली मुलींच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा ठराव पास केला. बाबासाहेबांनी ज्या अनेक परिषदा आयोजित केल्या, विशेषतः ज्या अखिल भारतीय महिला परिषदा आयोजित केल्या त्यात जे ठराव मांडले गेले. त्यातही स्त्री शिक्षणावर भर दिसतो नागपूरमध्ये श्रीमती सुलोचनाबाई डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली महिलांची परिषद भरली होती त्या परिषदेमध्ये भाषण करताना बाबासाहेब म्हणतात , "ज्या घरातील स्त्री सुशिक्षित आहे ते घर सुशिक्षित होते. मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष दे असतानाच मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नका."[३] औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून त्यात मुलींना प्रवेश दिला. स्त्रियांच्या प्रगतीच्या आड त्यांची लवकर होणारी लग्ने येतात. हे ही त्यांच्या लक्षात आले होते म्हणूनच ते म्हणतात, "मुलींची लग्ने लवकर करून वैवाहिक जीवन त्यांच्यावर लवकर लादू नका. आपल्या आयुष्याचा जोडीदार निवडण्याबाबत मुलींना अधिकार असावा. नाहीतर कितीतरी सुंदर मुलींचे नवरे कुरूप असल्याचे दिसते."[४] स्त्रियांच्या भावनांचाही आंबेडकर सहृदयतेने विचार करतात.

बाबासाहेबांचे स्त्रीशिक्षणाविषयीचे कार्य हे केवळ उपेक्षित, वंचित घटकातील स्त्रियांपुरतेच मर्यादित नव्हते तर देशातील सर्व स्त्री वर्गाच्या उद्धाराचे कार्य त्यांनी हाती घेतले. बाबासाहेबांचे हे विचार निश्चितच विकासाच्या दिशेने जाणारे आहेत.

**डॉ. आंबेडकरांचे स्त्रीसुधारणेविषयीचे चिंतन व विचार –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक भाषणातून व लेखनातून स्त्रियांच्या विकासासाठी त्यांनी संघटीत व्हावे व गुलामगिरी झुगारून द्यावी यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन केले. २७ डिसेंबर १९२७ रोजी महाड सत्याग्रह परिषदेत मोठया संख्येने स्त्रिया उपस्थित होत्या. तेव्हा मार्गदर्शन करताना आंबेडकर म्हणतात , " लुगडी नेसण्याची पद्धत, गळयात गळाभर गळसऱ्या घालणे, हातात कोपरभर कथलाचे किंवा चांदीचे गोठपाटल्या घालणे, स्वच्छतेने वागा, मेलेल्या जनावरांचे मांस खाऊ नका, आपली पुढची पिढी सुधारावयाची असेल तर तुम्ही मुलींना शिक्षण द्या."[५] याचा परिणाम म्हणून काही दलित स्त्रियांनी आपल्या राहणीमानात बदल केला. ज्ञान व विद्या या दोन्ही गोष्टी पुरूषांसाठीच नाहीत तर स्त्रियासाठीही आहेत हे त्यांनी स्त्रियांना सांगितले. १९३६ मध्ये देवास वाहिलेल्या स्त्री –पुरुषांच्या मुंबईतील सभेमध्ये स्त्रीजात ही समाजाचा अलंकार आहे. वेश्या जीवनातून बाहेर पडा व एक 'माणूस' म्हणून चांगले जीवन जगा असाही सल्ला दिला. १९४२ मध्ये नागपूर येथे झालेल्या अखिल भारतीय दलित महिला वर्ग परिषदेत भाषण करताना त्यांनी स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून मी एखाद्या समाजाची प्रगती मोजीत असतो असे मत मांडले. याच सभेत लग्न झाल्यानंतर प्रत्येक मुलीने पतीची गुलाम न होता मैत्रिण बनावे, प्रत्येक कार्यात सहभागी व्हावे, गुलामांप्रमाणे वागण्यास नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा असे मार्गदर्शन केले. स्त्री-पुरुष समानतेसाठीची बाबासाहेबांची तळमळ येथे दिसून येते.

बालविवाह, मुलींचे शिक्षण, वैधव्य, सतीप्रथा, जातीतच विवाह करण्याचे बंधन याविषयी बाबासाहेबांनी चिंतन करून भाषणातून व लिखाणातून आपले विचार मांडल्याचे दिसते. भारतातील स्त्री नेहमीच सामाजिक, आर्थिक व धार्मिक बाबतीत सर्व प्रकारच्या अन्यायकारक बाबींना बळी पडलेली आहे हे ही त्यांनी नमूद केले होते. १९२९ मध्ये Bombay Legislature ने भारतातील पहिला Maternity Benefit Act कारखाने व खाणीमधील महिला कामगारांसाठी केला. त्यामध्ये डॉ. आंबेडकरांची भूमिका महत्त्वाची होती. समान काम समान वेतन असे धोरण त्यांनी आणले. त्यात त्यांनी स्त्री –पुरुष असा भेदभाव केला नाही. स्त्री – पुरुष समानतेचे हे एक पाऊलच होते.

१९४७ ते १९५१ या काळात ४ वर्षे १ महिने २६ दिवस सतत परिश्रम घेऊन डॉ. बाबासाहेबांनी 'हिंदू कोड बील' तयार केले. हिंदू कोड बील हे स्त्रियांसाठी एक सुरक्षा कवच आहे. असे बाबासाहेबांनी म्हटले होते. या हिंदू कोड बिलामध्ये वारसा हक्क, दत्तकविधान, उत्तराधिकार, घटस्फोट, पोटगी यासारख्या हक्कांचा समावेश केला. हिंदू कोड बील हे सर्व जाती, धर्म, संप्रदायांना लागू करण्यात आले. डॉ. बाबासाहेबांनी हिंदू कोड बील सादर केल्यानंतर त्याला प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांनी प्रचंड विरोध केला. बाबासाहेबांनी या बिलासाठी आपला मंत्रिमंडळाचा राजीनामाही दिला मात्र त्यापुढील काळात हिंदू कोड बील विविध लहान बिलातून स्वतंत्रपणे मंजूर झाले. स्वतंत्रपणे मंजूर झालेल्या बिलातून स्त्रियांना पुढीलप्रमाणे हक्क व अधिकार मिळाले.

1. पोटगीचा अधिकार २) स्त्रीला स्वत:हून घटस्फोट घेण्याचा अधिकार ३) स्त्रियांना स्वत: कमविलेल्या मिळकतीवर अधिकार ४ ) स्त्रियांना मूल दत्तक घेण्याचा अधिकार ५) मुलीला वडिलांच्या मिळकतीवर मुलांइतकाच समान हिस्सा मिळविण्याचा अधिकार ६) स्त्रीला स्वत:चा वारस निश्चित करण्याचा अधिकार ७) आंतरजातीय विवाह करण्यास मान्यता ८) पतीला एक पत्नी असताना दुसरा विवाह करण्यास बंदी .

भारतीय संविधान व हिंदू कोड बीलाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना एक अनमोल अशी देणगीच दिली . डॉ. बाबासाहेबांचे स्त्रीमुक्तीचे हे अथक प्रयत्न महत्त्वाचे आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्रीविषयक विचारांचे आजच्या काळातील महत्त्व-**

स्त्रिया शिक्षित झाल्या तर कुटुंब शिक्षित होईल त्यामुळे देशाची उन्नती होईल असे डॉ. बाबासाहेबांचे मत होते. त्यांनी भाषणाच्या व लेखनाच्या माध्यमातून स्त्रियांची अन्याय, अत्याचार व गुलामगिरीतून मुक्तता झाली पाहिजे यासाठी केलेले प्रयत्न आपणास विसरता येणार नाहीत.

डॉ. बाबासाहेबांच्या या कार्याच्या संदर्भात डॉ . कुमुद पावडे म्हणतात, " बाबासाहेबांच्या या अनन्य साधारण निर्मितीचे स्त्रियांसाठी जे मोल आहे हे हिंदू स्त्रियांनी आपल्या चामडयाचे जोडे करून बाबासाहेबांना घातले तरीही ते ऋण न फिटण्यासारखे आहे. भारतीय संविधानानंतर म्हणजे भारतीय स्वातंत्र्योत्तर नजीकच्या काळात हिंदू कोड बिलाची घडण झाल्यामुळे स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने याचे महत्त्व असाधारण आहे. आज किती हिंदू स्त्रिया आहेत की, ज्यांना हे ठाऊक आहे की, आमच्या सन्मान पूर्वक अस्तित्त्वासाठी आणि आमच्या मुक्तीसाठी या महामानवाने जीवाच्या जोखमीने प्रयत्नांची पराकाष्ठा केली."[६] तर डॉ .लीला पाटील डॉ. बाबासाहेबांच्या बद्दल गौरवोदगार काढताना म्हणतात , "डॉ . आंबेडकर यांनी २६ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे भरलेल्या परिषदेत मनुस्मृतीचे दहन करून प्रतिक्रांती विरुद्ध क्रांती केली. म्हणून मनुस्मृती दहन हा स्त्री स्वातंत्र्य प्रेरणेचा दैदिप्यमान उज्ज्वल आविष्कार आहे. केवळ अस्पृश्य नव्हे तर समाजातील सर्व वर्गीय स्त्रियांना मुक्ती –लढ्याचे वैचारिक बळ डॉ. आंबेडकर यांनी दिले . मुक्ती –लढ्याच्या चळवळीचे सूत्र स्त्रियांनी स्वत:च्या हाती घ्यावे ही भूमिका प्रस्थापित करण्यात त्यांनी यश मिळविले. एका मूक नायकाने स्त्रीला शब्दांच्या वाणीचे सामर्थ्य दिले. तिला आकाश कवेत घेण्याचे स्वप्न पहावयास शिकविले. अंत:करणात कोटी कोटी सूर्य प्रज्वलित केले. नव्या आदर्शाची जाण दिली. अस्मिता फुलविली."[७]

संविधान व हिंदू कोड बिलामध्ये केलेल्या तरतुदीमुळे स्त्रियांच्या जिवनातील अंध:कार नाहीसा झाला. डॉ . बाबासाहेबांचा स्त्रीस्वातंत्र्य व स्त्रिशिक्षणाबद्दलचा उदात्त दृष्टिकोन स्पष्ट होतो. आजच्या युगातदेखील डॉ. बाबासाहेबांचे विचार निश्चित विकासाच्या दिशेने घेऊन जाणारे आहेत म्हणून आज देखील शिक्षण आणि समाज समृद्ध करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची गरज आहे असेच म्हणावे लागेल.

**निष्कर्ष –**

१) स्त्रियांच्या शिक्षणामुळे समाजाची व पर्यायाने देशाचीही उन्नती होईल हे डॉ. बाबासाहेबांच्या विचारातून स्पष्ट होते.

२) भारतातील बहुजन समाजातील स्त्रियांबरोबर समाजाने नाकारलेल्या स्त्रियांनाही सन्मान मिळवून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी प्रयत्न केले.

३) स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीयदृष्ट्या सक्षम करण्याच्या कार्यात डॉ. बाबासाहेबांचे मोलाचे योगदान आहे.

४) स्त्री मुक्ती व स्त्री –पुरुष समानता यासाठी डॉ. बाबासाहेबांनी केलेले कार्य अतुलनीय आहे.

५ ) संविधान व हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रियांना कायद्याद्वारे अधिकार प्राप्त करून देण्याचे काय डॉ. बाबासाहेबांनी केले.

**संदर्भ :-**

१) माळी (डॉ) मा.गो. 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले', आशा प्रकाशन, गारगोटी, द्वितीयावृत्ती, ३ एप्रिल १९८१ पृ. २

२) गाढाळ डॉ. एस. एस. – 'आंबेडकरी चळवळीचा इतिहास' , कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, द्वितीयावृत्ती, २ आक्टोंबर २०१९, पृ. ३६५

३) तत्रैव पृ. ३७२

४) गवळी टी.ए . संपादक - 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ',
डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती – उर्मिला पवार. पृ. ५०१

५) तत्रैव पृष्ठ ४०२

६) पावडे डॉ. कुमुद – 'फुले आंबेडकरी स्त्री चळवळ', पृ. २८

७) पाटील डॉ. लीला- 'फुले आंबेडकरी स्त्री चळवळ', पृ. १५५